# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत **महाविद्यालये,**
शिवाजी विद्यापीठ, **कोल्हापूर**

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची एन.एस.पी. पोर्टलवरून प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...

**संदर्भ:-** १) मा. शिक्षण सहसंचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),पुणे यांचे दि.१८/१०/२०२१ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी एन.एस.पी. पोर्टलवर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/संस्थांनी **अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांपर्यंत सदर योजनांची माहिती पोहचवणे आवश्यक आहे.** तसेच सर्व महाविद्यालये/संस्थांनी त्वरीत **एन.एस.पी. पोर्टलवर इंस्टिटयुट प्रोफाईल अचूक भरून अद्ययावत करावी.**

तरी सोबत जोडलेले संदर्भांकित पत्र अवलोकनी घेवून **विहित कालमर्यादेत** महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून त्वरीत करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (affiliation.t2@unishivaji.ac.in) इमेलद्वारा तात्काळ या कार्यालयास कळवावा. याअनुषंगाने येणाऱ्या अडचणी, केलेला पाठपुरावा व कार्यवाही याची सर्व महाविद्यालयांनी इत्यंभूत नोंद ठेवावी.

तसेच याबाबत भविष्यात उद्भवणाऱ्या अडचणींसदर्भात संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

**आदेशान्वये**

**श्री.विलास एस. सोयम**
**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-२ विभाग**

सोबत- वरीलप्रमाणे 2 9 OCT 2021
संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 699

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
E-mail: schol.dhepune@gov.in
web: www.dhepune.gov.in
फॅक्स ०२०/२६१११११५३
फोन नं.०२०/२६१२६९३९
दिनांक- १२.१०.२०२१
क्र.उशिसं-२०२१-२२/केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती /11131
18 OCT 2021
प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची NSP पोर्टलवरुन सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :१. या कार्यालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०२१-२२/९७३३ दि.३०/०८/२०२१**
**२. या कार्यालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य/सी एस एस /२०२१-२२/९७२१ दि.२७/०८/२०२१**
**३. या कार्यालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य/दिव्यांगजन/२०२१-२२/१००४७ दि.०८/०९/२०२१**

केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १.केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना २.महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना ३.अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते.

सदर शिष्यवृत्तींची अंमलबजावणी केंद्रशासनाच्या प्राप्त सुचनांनुसार दि. १८ऑगस्ट २०२१ पासुन सुरु झालेली आहे.तसेच विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२१ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.याबाबत सर्व विद्यापीठे / महाविद्यालये तसेच सर्व विभागीय सहसंचलाक कार्यालयांना संदर्भीय पत्राद्वारे सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शिष्यवृत्ती योजनांसाठी एन.एस.पी पोर्टलवर प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची संख्या अत्यंत कमी दिसुन आलेली आहे. याबाबत सर्व महाविद्यालये/संस्थांनी त्यांच्या महविद्यालयात शिकणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती योजनांची माहिती देण्याबाबत आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात.

तसचे सर्व महाविद्यालये / संस्थांनी एन.एस.पी पोर्टलवर ईंस्टिटुट प्रोफाईल अचुक भरुन अद्ययावत करणे आवश्यक आहे.प्रोफाईल अद्ययावत न केल्यास महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या अर्जावर पुढील कार्यवाही करता येत नाही. महाविद्यालये / विद्यापीठे यांचेमधील एकही पात्र विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासुन वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच संबंधीत विभागीय सहसंचालक यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव )
शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१

Scanned with CamScanner